# प्रकरण चौथे

## 'गावठाण' कादंबरीचे वाड्.मयीन मूल्यमापन

# प्रकरण चौथे

# 'गावठाण' कादंबरीचे वाङ्.मयीन मूल्यमापन


प्रस्तावना

निवेदन पद्धती व भाषा

बोलीभाषेचा वापर

मनाचा वेध घेणारी भाषाशैली

भाषेतील प्रवाहीपणा

'गावठाण' मधील काव्यात्मता

'गावठाण' मधील संवाद निर्मिती

प्रतिमांचा समर्पक वापर

'गावठाण' मध्ये येणारी व्यक्तिचित्रणे

वाक्प्रचार, म्हणी यांचा वस्तुनिष्ठ उपयोग

अस्सल ग्रामीण शिव्यांचा समावेश

कृष्णात खोतांच्या लेखनाचे वेगळेपण

निष्कर्ष

सारांश

संदर्भसूची

# प्रकरण चौथे

# 'गावठाण' कादंबरीचे वाङ्.मयीन मूल्यमापन

## प्रस्तावना :

'गावठाण' कादंबरी खऱ्या अर्थाने सचित्र व सजीव वाटते. ती तिच्या वाङ्.मयीन गुणवैशिष्ट्यांमुळे कादंबरीमध्ये वापरलेली निवदेन पद्धती, तसेच तिच्यामध्ये वापरलेली भाषा बोलीभाषा असली तरी योग्य ठिकाणी आलेले संवाद, वाक्प्रचार, म्हणी, सांकेतिक शब्द, यथार्थ उपमा यामुळे कादंबरी आणखीनच जिवंत वाटते. त्याचबरोबर कादंबरीतील चित्रमयता, योग्य ठिकाणी वापरलेले संवाद, ग्रामीण लयबद्धता, काव्यात्मकता, वातावरण निर्मितीसाठी ग्रामीण प्रतिमा, प्रतिके यांचा योग्य वापर केल्यामुळे तसेच भाषाशैली ही लक्षवेधी असल्यामुळे व तिच्यातील प्रवाहीपणामुळे कादंबरी अधिकच यशस्वी झाल्याचे दिसून येते.

Style is the man himself असे म्हटले जाते. प्रत्येक लेखकाची एक स्वतंत्र अशी शैली असते. त्या शैलीवरच साहित्यकृतीचे यशापयश अवलंबून असते. संस्कृत भाषाशास्त्रज्ञ वामन पंडित साहित्याची व्याख्या करताना म्हणतो,

१) काव्यं ग्राह्यात अलंकारात। सौंदर्य अलंकार :।। तसेच

२) रीतीरात्मा काव्यस्य।।'[१]

म्हणजेच त्याच्यामते सौंदर्य हाच साहित्याचा अलंकार असून रीती हाच साहित्याचा आत्मा असतो. रीतीलाच पद्धत, रीत, तऱ्हा, धाटणी, तंत्र म्हणून ओळखले जाते. यामधून कोणतीही साहित्यकृती फुलत असते; व ती प्रसिद्ध पावते. प्रत्येक लेखकाचे वेगवेगळे तंत्र असते, त्या तंत्रातूनच तो विविध वाङ्.मयीन गुणवैशिष्ट्ये आपल्या साहित्यकृतीत मांडत असतो.

कोणतीही कादंबरी ही त्यामध्ये वापरलेली भाषा, निवेदन पद्धती, संवाद, वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमा, प्रतिके, काव्यात्मकता, लयबद्धता, वातावरण निर्मिती इ.

वाङ्.मयीन वैशिष्ट्ये घेऊनच आविष्कृत होत असते. ह्या सर्व वाङ्.मयीन वैशिष्ट्यांना कृष्णात खोतांनी आपल्या गावठाण मध्ये योग्य न्याय दिला असून एका अस्सल, वास्तवस्पर्शी ग्रामीण कादंबरीची निर्मिती केली आहे. वाङ्.मयीन दृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या वरील सर्व वाङ्.मयीन गुणवैशिष्ट्यांची 'गावठाण' कादंबरीच्या माध्यमातून सखोल चिकित्सा प्रस्तुत प्रबंधलेखक ह्या प्रकरणात करणार आहे.

## निवेदन पद्धती व भाषा :

कोणत्याही कादंबरीचे यशापयश हे तिच्या निवेदन पद्धतीवर व त्यामध्ये वापरलेल्या भाषेवर अवलंबून असते. काही लेखक बोलीभाषेचा तर काही लेखक प्रमाण भाषेचा वापर करताना दिसतात. या भाषेमुळे कादंबरीला प्रवाहीपणा येत असतो. कादंबरीतील भाषा ही मनाचा वेध घेणारी काव्यात्म, प्रवाही स्वरूपाची असेल तर ती कादंबरी वाचनिय होते व प्रसिद्ध पावते. तसेच कादंबरीचे यश निवदेनावरही तितकेच अवलंबून असते, कारण निवेदन पद्धतीतून कादंबरी साकार होत असते. भाषा निवेदन हे प्रथमपुरूषी व तृतीयपुरुषी भाषा स्वरूपाचे असते. या निवेदन पद्धतीतूनच कादंबरी साकार होत असते.

'आनंद यादवांच्या 'गोतावळा' कादंबरीमध्ये यादवांनी प्रथमपुरूषी एकवचनी निवदेन पद्धती वापरली आहे. त्याचपद्धतीने कृष्णात खोतांनी आपल्या गावठाण कादंबरीत प्रथमपुरूषी एकवचनी निवदेन पद्धती वापरून ग्रामीणत्त्वाचा खरा आविष्कार केला आहे. 'गावठण'ची नायिका आंदी ही आपल्या स्वतःच्या जीवनाची शोकांत कहाणी कादंबरीमध्ये स्वतः सांगताना दिसते. तसेच कृष्णात खोतांनी 'गावठाण' मध्ये वापरलेली भाषा ही बोली भाषा असली तरी मनाचा ठाव घेणारी असून त्यामध्ये प्रवाहीपणा, संवाद, काव्यात्मता, उपमा, म्हणी या भाषिक वैशिष्ट्यांचा पुरेपूर वापर केल्याचे दिसून येते. प्रवाही निवदेन पद्धतीतून व उत्कट अशा बोली भाषेतून कादंबरी साकारलेली आपणास दिसून येते.

## बोलीभाषेचा वापर :

कृष्णात खोतांनी आपल्या गावठाण या कादंबरमध्ये बोलीभाषेचा वापर केला आहे. 'गावठाण' ची नायिका आंदी ही एक अशिक्षित मुलगी आहे. तिचं जीवन हे गुराढोरांबरोबर व शेतीवाडीबरोबर घडत जातं. त्यामुळे तिची भाषा ही त्या भागातील बोली हीच आहे, हीच आंदी आपल्या जीवनाची कथा या कादंबरीत सांगताना दिसते. त्यामुळे अपरिहार्यपणे या कादंबरीत बोलीभाषेचाच वापर झाला आहे. ही बोली पन्हाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या आसपासच्या खेड्यात बोलली जाते. ही बोलीभाषा पुढीलप्रमाणे कादंबरीत येताना दिसते.

कादंबरीच्या सुरवातीलाच ''तांबुजाईला नारुळ दिला तवा कुठं ढोरांच्या अंगावरल्या तांबवा गेल्याता. न्हाई तर सारी ढोरे तांबवांनी लचाडली हुती. दिसच्यादीस कावळं म्हसरांच्या अंगावर, कोंबडी दाणं येचत्यात तसं तांबवा येचीत हुती.''[२]

''माळावरच्या साऱ्या ढोरागुरास्नी तांबुजाई सांभाळतीया.दरवर्साला तिला योक नारुळ दिला म्हंजी धगधग न्हाई. आई म्हणतीया ते खरच हाय. नारुळ दिला नि आमी सगळ्यांनी 'ढोरा-गुरास्नी, माळावरल्या पोरास्नी सुखी ठेव म्हणून कवलं घेटला.''[३]

''दिसानं पार लामच्या डोंगरावर पाय टेकलं तसं माळावरल्यां बारक्या बारक्या दगडांच्या लामच्या लाम सावल्या पडल्या. हाडदातल्या जाळ्या एकमेकीला सावलीनं मिट्टी मारुन बसल्या.''[४]

अशा अनेक संदर्भामधून आपल्याला कादंबरीतील बोली भाषेचा वापर दिसून येतो. ग्रामीण भागातील असणारे बोलीभाषेतील सर्व शब्द आपल्याला 'गावठाण' मधून पदोपदी दिसून येतात. त्यामुळेच बोलीभाषेतून साकारलेली ही कादंबरी जिवंत व रसरशीत वाटते. बोलीभाषेत येणाऱ्या सर्व म्हणी, वाक्प्रचार, उपमा, प्रतिमा, प्रतिके, शेतीशी संबंधित सर्व शब्द ह्या सर्वांचा वापर यथार्थपणे कादंबरीतील बोलीत केल्याचे आपणास दिसून येते. कादंबरीतील काही संवादावरून आपल्याला बोलीचा आणखीण प्रत्यय येतो तो पुढीलप्रमाणे-

"तसाच सांभाळून ठेवं, घराकडं गेल्यावं गरवार बाईच्या घरावर टाकं."[५]

'व्हय म्हंजी परतच्याला दात येतुया."[६]

"सांजला सोमी देववालीला इचारायला पाहिजे. तू त्या पोत्यावर आडवी हू."[७]

"पोरे दिसभर भेंडाळ्ळीस. जा दोन घास खावून नीज जा."[८]

"चच्मा न्हवं गागल हाय, गागल,"[९]

"लवकरच ह्येला आंघुळ घालित जावा."[१०]

"खरं हाय पोरं तुमच्या हुंबऱ्यातन आत आली तरी ग्वॉड वाटंना त्ये काय लोक बघाय येत्याती?"[११]

अशा प्रत्येक संवादातून आपल्याला प्रमाणभाषेतील शब्दांबरोबरच बोलीभाषेचा वापर केल्याचे दिसून येते. या बोली भाषेतील निवेदनामुळे कादंबरी अधिकच वाचनीय झाली आहे.

**मनाचा वेध घेणारी भाषाशैली :**

कृष्णात खोतांनी वापरलेली भाषाशैली ही बोलीभाषा असलीतरी ती मनाचा वेध घेणारी आहे. बोलीतून प्रकट झालेल्या या कादंबरीतील काही प्रसंग एवढ्या ताकदीने चित्रित झाले आहेत की, ते मन हेलावून सोडतात व मनाचा वेध घेतात. खोतांची भाषाशैली ही ग्रामीणत्वाचा अस्सल आविष्कार करणारी अशीच आहे. ग्रामीण उपमा, म्हणी, दृष्टांत, वाक्प्रचारातून आकाराला येणारी भाषाही तिच्या प्रवाहीपणामुळे मनाचा वेध घेताना दिसते.

कादंबरीत प्रकट झालेली मनाचा वेध घेणारी भाषाशैली पुढील चित्रणातून दिसून येते.

"दऱ्यातली म्हस सोडली न्हाई. बाकीची ढोर घेऊन मी गेलो. तळ्याच्या काठावर, तळ्यात उगवत्या दिसाची किरणं नाचत हुती. त्येनं डोळं दिपून गेलं. थंड वाजत हुती. उनात शेरडी नि मी उन खाईत हुतो. रेडा एवढ्या थंडीत तळ्यात पोरागत पावत हुता."[१२]

"दीस पार कलंडायला गेला. तरी ऊन झेंडू फुटल्यागत लागतच हुतं. भारा आणताना मसुटीच्या चढाचं भ्याच वाटतय. गड्यासारखं गडी त्ये भेंडळायचं मला तरी जल्मच आठवायचा."[१३]

"आभाळ मघाशी लोटलेल्या खळ्यागतीनं हुतं नि आता उगीच कसं वटारलंया."[१४]

"मी तशीच उठलो. खाली न बघताच पळाय लागलो. करवंदीचा मोळ्यागत काटा वल्या लाकडात घुसल्यागत टाचत टापारला... सखीनं माग धरलं. भासऽऽ दिशी काटा उपसला. भळाभळा बाटलीच टोपान काढल्यागत रगात बाहीर आलं. झिंज्याची रिबीन सोडली नि बांधली."[१५]

"म्होरनंच पाटाचं पाणी कावळ्याच्या डोळ्यागत वाहत्यालं दिसतं हुतं. कुतऱ्याच्या आवाजान खळ्याएवढ्या करवंदीच्या जाळीतनं लावऱ्यांचा कळप भारदिशी उडाला. चिवचिव करत दोन तीन कासऱ्यांवर जावून जीव मुठीत घेऊन पडला. पाण्यातल्या पाणकोंबड्या लांबलांब ढेंगा टाकीत जवळच्याच जाळीत शिरल्या. सागावरचा 'सुतारपक्षी' टाकऽटाकऽऽ करत्याला टोच मारायची थांबवून गप्प बसला."[१६]

माळाला आग लागल्यामुळे पिल्लाचं घरटं जळून खाक झालं होतं, आंदी दुसऱ्या दिवशी माळावर जाते तेव्हा ती म्हणते, "मी हाती दगडाकडं गेलो. त्येच्या खालचं घरटं बघिटलं, डोळं मिटलं, काल-आज दुपारी त्या घरट्यातल्या पिलाजवळ बसलो हुतो. नुसतं डोळं मिट्‌ मिट्‌ करत्याली. घरट्यासकट जळून खाक. दुपारी बघिटलं तवा हालत हुती आता मातुर कुठल्या कुठं गेली? त्येंची आई कुठं गेली आसलं? का ह्येंच्याबरुबर जळून गेली आसलं? जळून गेली नसली तर कुठं आसलं? त्या आगीत जळताना त्यांस्नी तिनं बघिटलं असंल? काय तिचा जीव झाला आसलं? कशाचा पत्या न्हाई. थोडबूत हाडूद वाचला. खरं अशा किती किड्या-मुंग्या, पाखरं जीवाला मुकली ह्या आगीत त्येचा बी पत्या न्हाई. काय मिळविलं पेटविणाऱ्यानं त्येचा बी पत्या न्हाई."[१७] या वर्णनातून तसेच.

''सखी जीवाची सखी हुती. ती माळावर कवा इल का? ही दगड, जाळ्या, तांबुजाई आल्यावर तिला वळीखतील का?''[१८]

''चूल पेटना म्हणून अर्धा शेणीवर तिनं राकीलची आर्धी चिमणी पालती केली. काढी वढली. तशी भाक दिशी चूल पेटली. च्याचं आदानं ठेवलं. सतरा जातीच कप सतरा घरातनं गोळा केलं हुतं. त्यातनं साऱ्यास्नी च्या दिला.''[१९]

''गाड्यांचा आवाज कणकणत हुता. घुंगराच्या आवाजानं मनं दुधागत उतू जायचं. गाढीच्या चाकागत मन पळत्याल. ते थेट घरात गेल.''[२०]

''डोसकं मातीच्या घागरीगतं उकलाय लागल्यालं, डोळ्यातनं ठेंबका तुटंना. वंजळीतल्या पाण्यागत किच्च जरी दावून धरलं तरी धारचं लागत हुती. देवा कसली रं बाई नि बापय निरमान केलास? बाईच्या जीवाचा कोण इचार करतय?''[२१]

''मेलासा तर त्येचं काय जातंय. असू दे तिकडं- उगचं डोस्क्यात घेवू नका. चार दिवस बर वाटतयं. तुमाला बरं वाटल्याव बैलं तरी काय करायचीत? बहादरीनं ह्ये रानं कुदळीनं उकरून पेरील न्हाईतर नांगरबी वढील.''[२२]

''त्यास्नी गाडीत घाटलं. तसा हुंदका धराण फुटल्यागत फुटला. गावात आलो. सारं गाव रडलं. आभाळ फाटल्यागत झालं.''[२३]

अशा अनेक चित्रणांमधून कृष्णात खोतांची मनाचा वेध घेणारी भाषाशैली दिसून येते.

## भाषेतील प्रवाहीपणा :

कृष्णात खोतांनी 'गावठाण' कादंबरीतून मांडलेली भाषा ही जसा मनाचा वेध घेणारी आहे. त्याचपद्धतीने तिच्यामध्ये प्रवाहपणाही असल्याचे दिसून येते. तो संपूर्ण कादंबरीमध्ये सहजगत्या व ओघानेच येताना दिसतो. कुठेही तो ओढून-ताणून आणल्याचे आपणास दिसून येत नाही. भाषेतील प्रवाहीपणामुळे ग्रामीण जीवनातील रेखाटलेले प्रसंग व

अनुभव हे सचित्र व जिवंत वाटतात. कादंबरीतील प्रवाहीपणा पुढील चित्तारलेल्या प्रसंगातून दिसून येतो.

'अंधार पडाय लागला तस मला बी पाण्यात बुडल्यागत वाटाय लागलं. दऱ्याच्या वाटंचं लय येळा इक्रीत ईक्रीत घडल्याचं ऐकलं हुत.'[२४]

''एवढा वकूत हुतोय हे काय सपानं पडलय व्हय मला? त्येचा आयलाऽ येळच बरी, न्हाईतर मरतच हुतो. सारीच आंधारात ठेचकाळल्यात झालो.''[२५]

'गावाला तसा काय त्यो भारी न्हवता. खरं एका एकाला धरून त्यो दमवायचा. पाण्यापायी, तर कधी वाटपायी, साधी हागायला त्येच्या रानाबिगर जागा न्हाई. त्येच्यासंग वाकडं म्हंजी गावात म्हणायचीत, ''हागायचं वांद''.[२६]

''पाण्याचा थेंब इस्तवावर पडला नि चारऽऽ दिशीऽ आवाज आला... आई बी गप्प, दादा बी, मी बी गप्प, चूल तेवढी ढाणढाण पेटत्याली.''[२७]

''गावचं तळं भरून वाट चुकल्याल्या कोंबडीच्या पिलागत पाणी पळत्यालं. वढा पोट भरून माणूस वकल्यागत वहात्याला.''[२८]

''लाम लाम ढेंगा टाकल्यावाणी पडत्याला ठेंबका वाढला. पावळणी गळाय लागल्या.''[२९]

''लय भारी जनावराचं, इचार केला, खरं तसं हुनार न्हाई, लगीन हुणारं, नवरा, पोरं. सारं वाट्याला येणार.''[३०]

रेडा विकल्यानंतर आंदीच्या घराची व्याकूळ मनोवस्था सांगताना आंदी म्हणते, ''रेड्याच्या जाग्यालाबी पेंडी सोडली नि डोळं मिटून घेटलं. ढोरं सुताकं आल्यागत उठलीच न्हाईत. ते बघून तरी पोटात चटणी टाकल्यागत भगभगायला लागलं. दादांच्या घोंगड्यात मी बी शिरलो. तर उनजाळ पाणी दादांच्या डोळ्यातनं यीत हुतं.''[३१]

''खरं हाय माणसात आई न्हवती, दादा न्हवतं, गोठ्यात ढोर बी दिसत हुती, खरं टिक्की म्हस न्हवती. गाय न्हवती, सगळ हाय खरं नसल्यागत हाय. साऱ्यास्नी बघिटलकी भडभडून यायचं. डोळ्यातलं पाणी अंधारातच वाट चाचपडत बसायचं.''[३२]

"जावा जावा का कुणासं ठावं दोनतीन दीस बोलनात. लय वंगाळ वाटलं, रोजच्याला एका जाग्याव बसायचं. तोंड बघायची नि ढोरागत मुकं न्हायाच. बरचं वाटना. ढोरं बी त्येच्या भाषेत बोलतं असतील खरं आमचं भाषण न्हाई."[३३]

"त्येच्या बोलण्यान माझ्या नांदण्याच वाळवाण हुतयं काय त्येच समजना. म्हशीला रेडी, गायीला पाडा, बाईला पोरगा माणसांना पाहिजे असतोय. मग रेडीला रेडा कुठला? पाड्याला पाडी कुठली? नि पोरग्याला पोरगी कुठली? ह्यो का विचार करीत न्हाईत माणसं."[३४]

"पोरी पोटाला आल्या म्हंजी आई-बाला जन्मभर त्येंचा इचार, लगीन झालं की बाळंतपण, बाळंतपण झालं की पोरगा नि हुतोय की न्हाई ह्येची चिंता."[३५]

'पिशवीतनं दाणं आणल्यालं बघितलं नि मी वावटुळातल्या कुपागत हालाय लागलो. कुरवाड्याला टोपल्यातलं खायची सवं. पिशवीत दाणं बघून गलबलून गेलं."[३६]

"उगवलं त्यो दिस मावळला की बरं वाटत हुतं. लोक उगवत्या सूर्व्याला हात जोडत्यात. मी मावळत्या सूर्याला हात जोडायची. त्येंबी घरामागल्या गारीवरनं. गारीवरचा टाकल्याला राखुंडा हातात घेऊन मनातल्या मनात बडबडत हुतो. "बाबा रं असाच रोज मावळत जा."[३७]

"कुठलं सुचतय आंदे, दुखणकरी घरात आसल्याव डोस्क्यात किडं पडल्यागत हुतय. घराच्या वास्याला वाळवी लागल्यागत. मोठी मोठी माणसं दवाखाना नि कोर्टाच्या पायरीनं घाईला येत्यात नि आपलं तर काय?"[३८]

"पोरीचा बा बी मीच नि आई बी मीच. मी काळीज फाटलं तरी दाबून धरलं डोळ्यातनं पाणी आलं तरी कोनात पाडलं."[३९]

अशा अनेक प्रसंगांमधून कादंबरीला आलेला प्रवाहीपणा आपल्या लक्षात येतो. भाषेच्या प्रवाहीपणामुळे कादंबरी वाचनीय झाल्याचे जाणवते.

LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## 'गावठाण' मधील काव्यात्मकता :

'गावठाण' कादंबरी वाचत असताना लेखकाच्या ओघवत्या भाषाशैलीमुळे कांदबरी प्रवाही वाटते. कादंबरीचे लेखन हे काव्यमय झाल्यासारखे वाटते. त्यामुळे भाषाशैली मनाचा वेध घेताना दिसते. तरीही ग्रामीण भागावर चित्तारलेल्या ह्या कादंबरीत लोकपरंपरेनुसार काही लोकगीते आल्याचे दिसून येते. अशापद्धतीची लोकगीते ही शेतकरी शेतीची कामे करताना, स्त्रिया सणांमध्ये खेळ खेळताना गाताना दिसून येतात. त्यातूनच कादंबरीला काव्यात्मतेची किनार लाभल्याचे दिसून येते. 'गावठाण' मध्ये आलेली काव्यात्मता पुढीलप्रमाणे–

माणसं मळणीच्या दिवसात–

''माझ्या खिल्लारी गायीच्याऽऽ
गायीच्या पाड्याला वडावऽऽ''[४०]

अशा पद्धतीची लोकगीते म्हणतात. तर औत धरल्यानंतर बैलांना ऐकविण्यासाठी शेतकरी गाणं म्हणताना दिसतात.

''माझ्या गाईच्या वासराला यावंऽऽ
माझ्या प्रधानाला वढाव ऽऽ
हाऽऽ हा ऽऽ दॉ–दॉ– राजाऽऽ, प्रधानाऽऽ''[४१]

अशाप्रकारची जानपद गीतरचना या कादंबरीमध्ये लेखकाने चित्रित केल्याचे दिसून येते.

## 'गावठाण' मधील संवाद निर्मिती :

'गावठाण' च्या यशस्वीतेमागे त्यामधील भाषाशैली व तिच्या प्रवाहीपणाबरोबर मनाचा वेध घेणे जरी असले तरी कादंबरीमध्ये आलेल्या 'संवादनिर्मिती' ह्या वाङ्.मयीन वैशिष्ट्यामुळे कादंबरी अधिक फुलल्याचे दिसून येते. 'गावठाण' मध्ये आलेलं संवाद हे लेखकाने एवढे चपखल निर्मिलेले आहेत की, ते वाचत असताना मनाची उलघाल होते.

संवादामधून कृष्णात खोतांनी प्रत्येक पात्र व प्रसंग जिवंत केल्याचे दिसून येते. कादंबरीमध्ये आलेले काही महत्त्वाचे संवाद पुढीलप्रमाणे–

आंदीचे वडील रामा सावकाराची म्हैस आणायला जातात व त्यांना यायला खूप उशीर होतो. तेव्हा आंदी, आई, आण्णा यांच्यामधील घडलेला संवाद पुढीलप्रमाणे–

''न्हाई बाई, कोण काळं कुत्रं वाटला दिसंना, नि माणसाच त्वांड बी आता वळखंना एवढा वकूत झालाय.''

''काय करायच ग आई?''

''काय करायच हे पॉर बी कुठं गेलंय?''

तवर आण्णा तालमीतनं आला,

''दादा आल न्हाईत व्हय?''

''न्हाईत बाबा.''

''कुणाला इचारायचं तरी न्हाई व्हय!''

''कुणाला इचारायच? बांगच्या टेकावरनं पार खालतीकडं नदार टाकून आलो. काय वास–पूस न्हाई कि काय न्हाई !''[४२] गुर राखणारी आंदी गुराकडं गेल्यानंतरचा तिच्या मैत्रिणीमधील संवाद–

''आंदे रखमीचा दात पडला आगऽऽ''

''म्हणताना रडतीया व्हाय?''

''व्हाय''.

''तसाच सांभाळून ठेव, घराकडं गेल्यावं गरवार बाईच्या घरावरं टाकं,''

''व्हयं म्हंजी परतच्याला दात येतुया.''[४३] सखी बोलली, केरूआबाच्या शिवरात आंदीची ढोरं गेली म्हणून केरूआबा आंदीच्या दादांबरोबर भांडतो त्यावेळचा संवाद पुढीलप्रमाणे–

''कोंड्या तुझ्या पोरीला ताकीद दे, ढोरं यवस्थित राखायचीत.''

''का गा आबा?''

''आबा, आबाच्या आईचा ढबा.''

''कोंड्या सारी पोरं म्हणत्याती, तुझ्या गायीनं सारा भुईमुग नि तूर खाल्लीया. जर परत गाय न्हाई तर एकादं व्हार आलं तर खांडूळी झालीच म्हणून समज.''

''गावातल्या कुणाची ढोरं यीत न्हाईत वाटतं? माझी त्येवढी येत्याती?''

''लय नाक फुगवून बोलू नकं. नाकफुडी फोडून ठेवीन.''

''ये जा–जा– जवाचं घव तवाच्या पोळ्या बघू.''[४४]

म्हाताऱ्या पावसात आंदीच्या घराची भिंत भिजून फुगल्यावर ती पडायला होते तेव्हा सखूदा आणि दादा यांच्यामधील संवाद–

''आराराऽरा, ह्ये रं काय कोंड्याऽ''

''त्येच्या आयला, पायातनं वर वल चढतीया नि सारं गरवारतया.''

''आरं मर्दाच्या, कवा सारचं गप्पदिशी खाली बसलं.''

''तुझ्या आयला, ह्ये शानपणं शिकवायला आलायसं व्हय रं!''

''दे तंबाखू खरं हाय तेच बोलतोय.''

''व्हयं, पर्तेकाच मराण बी खर हाय. पर त्ये बोलायचं नसतयं''

''तुला एवढा राग यायला. लेका घर पडायच्या आगुदर बघीटलसं तर काय हुईल?''[४५]

गोंदुआबाची मळणी पावसात भिजल्यावर दादा, गोंदुआबा, त्याची बायको आणि आंदीची आई यांच्यामधला संवाद–

''कोंडुदा वरीसच्या वरीस पाण्यात गेलं.'' गोंदुआबा आसं म्हटला आणि त्येला हुंदकाच फुटला त्यो पोरागत रडायला लागला.

''आरं मळणीतलं भात बाहीर जाईत न्हाई. शानाच हायसं,'' दादा म्हनलं, त्येची बायकू सांगाय लागली.

''बघताय न्हवं? एकंदिशी आळूस केला न्हाई. खरं ह्ये काय तोंडात आलं नि पळवून नेलं म्हणायचा डाव आला.''

''पळून कशानं जातयं'' आई म्हनली. [४६]

सखीचं लग्न ठरत असताना पाहुण्याचं बोलणं चाललेलं असतं तेवढ्यात नारूआबा येतो. तेथील संवाद–

''ये ये नारू आबा ''सखीचा चुलता बोलला

''नमस्कार, पाव्हणंऽऽ'' नारूआबा म्हनला.

''नमस्कार, नमस्कारऽऽ''

''बोला काय म्हणतायसा? पोरीला बघिटली?''

''बघीटली पोर पास हाय.''

मग येळ कशाला, बोला की–''

''बोलायच ते बोललोय.''

नारुआबाला सखीच्या चुलत्यानं सारं सांगीतल तेव्हा नारूआबा म्हणाला, ''पाव्हणं कुठंतरी गाठ बसलं आस बोला. एवढ्या लाम पळून आम्हांस्नी गाठून काय घेताय!''[४७]

सखीच लग्न झाल्यावर रंगीला व आंदीला माळावर आल्यावर सखीच्या आठवणीने खूपच उदास वाटतं. त्याचवेळी त्या दोघींना आकाशात पाखराचं थवंच्या थवं जाताना दिसलं. त्यावेळी त्या दोघींमध्ये घडलेला संवाद–

''रंगे ह्या पाखरांच घर एकच असंल?''

''काय ठावं! खर मिळून जात्याती बघ सारी.''

''व्हय खर घरटी येगळी असतील.''

''व्हय एका घरट्यात एवढी पाखरं कुठली मावत्यात?''

''नसली तरी झाड एकच असंल. तेवढं तरी काय थोडं झालं?''

''आमच तेवढं तांबुजाईन करावं.''

''व्हय''[४८]

रामा सावकारान आंदीच्या घरची आगतिकता पाहून व शब्दात पकडून सहा महिन्यांची गाभण म्हैस नेली त्यावेळी धारंची भांडी सोडून दयावयाच्या पैशांबद्दल आई दादांमधला संवाद पुढीलप्रमाणे-

"किच पैसं देतोय कुणास ठावं, मी ध्वाडनिन सबागती बोलाय गेलो तेवढाच सबुद धरला."

"धरू दे, सारचं कुठलं साधल," दादा बोलले.

"....." आई म्हनली.[४९]

आंदीच्या सासरी तिला जावांकडून खूप त्रास सहन करावा लागतो. एका रात्री ती हे सर्व नवऱ्याला सांगते त्यावेळी त्यांच्यामध्ये घडलेला संवाद पुढीलप्रमाणे-

"न्हवं, तुमच्या वैन्या, काय न्हाई-न्हाई त्ये दोन दीस बोलत्याता."

"काय बोलत्याता?"

"न्हवं, काय बोलत्याता ते तरी कळाय पाहिजे?"

"काय बी म्हणत्यात."

"काय बी म्हंजी?" मला कायच सूचना.

"मध्यान झालीया, माणसं उठून काय म्हणतील?"

"त्ये आगुदर डोक्यात यायला नग?"

"तुला सांगुन ठेवतो, माझ्या घराचा मांडव घालायचा न्हाई."[५०]

आंदीच्या पोरग्याच्या बारशाच्यावेळी दारिद्र्यामुळे आंदीच्या दादांना पैशासाठी पालवी विकावी लागतात त्यावेळी आई व दादांमध्ये घडलेला संवाद-

"न्हवं, गडावरन येतो."

या खरं, पैशाच काय?"

"आता खाटक्याकडचं जायला पाहिजे."

"व्हय, त्योबी देतोया का न्हाई कुणास ठावं."

"आता त्यो बाटका, आदुगर पैसं. म्हंजी पालवी पाडूनच मागणार."

"नि सारी घडुतं त्या पैशात बसत्यात का न्हाई कुणास ठाव."[५१]

आंदीच्या नवऱ्याचा आजार वाढल्यामुळे घरी औषधासाठी व अन्नपाण्यासाठी पैसा पुरत न्हाई, तरीही आंदीची धडपड चालूच असते. पैशामुळे तिचा नवरा तिला औषध संपल्याच सांगत नाही. त्यावेळी त्या दोघांमध्ये घडलेला संवाद–

"अवशदं सपल्यात, सांगायच न्हाईसा."

"हं हायत की आजून चार दिवस जातील."

"चार दिवस का चार म्हैनं?

"आंदे तू आमच्या पोटाचं बघशील का अवशदाचं? दोन दिवस तुला पॉटभर भाकरी न्हाई. काय हुतय मला?"

"काय हुतय? आज आणतोय कुणाच्यातनं तरी मक्क. टोकणाय बी येतील नि दळणालाबी."[५२]

आंदीचा नवरा वारल्यानंतरही तिचा तिच्या जीवनाशी अखंड संघर्ष चाललेला असतो. तो तिच्या मुलग्यासाठी. अशातच तिचा मुलगा आजारी पडतो. त्याला डॉक्टरकडे घेऊन गेल्यावर डॉक्टर आणि आंदी ह्यांच्यामध्ये घडलेला संवाद–

"वहीनी असं कवा झालं हुतं आधी?"

"कवाच न्हाई," मी म्हनलो.

"मी तुम्हाला चिठ्ठी देतो. कोल्हापूरला त्या डॉक्टरकडे जावा."

डॉक्टर असं म्हनलं नि मी ठेचकाळल्यागत झालो.

"काय झालयं ह्याला?"

"काय न्हाई कोल्हापूरला दाखविल्यालं बर आपल्या वगीचा डॉक्टर हाय."[५३]

या अशा अनेक संवादातून कादंबरी आकार घेत असल्याचे आपणास दिसून येते. कादंबरीतील उत्कट संवादामुळे कादंबरी वाचनीय झालेली आहे हे मात्र निश्चित.

## प्रतिमांचा समर्पक वापर :

'गावठाण' कादंबरीतून कृष्णात खोतांनी वापरलेल्या प्रतिमा ह्या आपल्याला पानोपानी दिसून येतात. अतिशय समर्पक अशा उपमांमुळे कादंबरी सचित्र व जिवंत झाल्याचे दिसून येते. तसेच यथार्थ प्रतिमांमुळे ग्रामीण भागाचं वास्तव जीवन अतिशय उत्कटतेने प्रगटलेले दिसून येते. कादंबरीत येणाऱ्या प्रतिमा ह्या ग्रामीण भागाशिच संबंधित आहेत. त्या प्रतिमांमुळे प्रत्येक प्रसंग आपल्याला भावतो व मनावर कोरला जातो. 'गावठाण' कादंबरीमध्ये आलेल्या प्रतिमा पुढीलप्रमाणे–

''कोंबडी दाणं येचत्यात तसं तांबवा येचीत हुती''[५४] यामध्ये तांबवांना दाण्याची उपमा दिल्याचे आपणास दिसून येते. तसेच 'गाय तरी घोड्यागत कुठणबी उडी घ्यायची.''[५५] इथे गायीला घोड्याची उपमा दिली आहे.

''दिसानं जोतिबाच्या डोंगरातन डोस्कं वर काढलं.''[५६] या ठिकाणी सूर्य उगवण्याला डोस्क वरं काढलं अशी उपमा योजिली आहे. ''हत्ती दगडावरनं मी घटकघटकला घारीसारखी वाट बघीत होतो.''[५७] या ठिकाणी वाट बघण्याला घारीची उपमा दिली आहे.

''अंधार पडाय लागला तसं मला बी पाण्यात बुडल्यागत वाटाय लागलं.''[५८] या ठिकाणी काळोखाला पाण्यात बुडण्याची उपमा दिली आहे.

'म्हसं पाळणा हालल्यागत हालत हुती.''[५९] इथे म्हैसीच्या हालण्याला पाळण्याची उपमा दिली आहे. अशाप्रकारे गावठाण मध्ये आपल्याला पानोपानी उपमा आढळून येतील. अशाच काही संपूर्ण कादंबरीतून दिसणाऱ्या उपमा पुढीलप्रमाणे–

'लंगडी घालत्याला पोरीगत एक पाय वर धरूनच हुबी ऱ्हायची.''[६०]

'बाईच्या गळ्यातल्या डोरल्यागत हिला लोढण्याची अडचण झाल्याली.'[६१]

'आमची म्हसं तांबुजाईच पाषाण रवल्यागत हुबी.'[६२] 'पालवं कासत गेलं की शेरडीची थान कणसाच्या पिशीगत करायच.'[६३]

'तुम्हास्नी दम न्हाई. लगीच प्याल्यागत वकलासा.'[६४]

'म्हस गप्पगार पाण्यात बसल्यागत हुबी ऱ्हायली.'[६५]

'पाडी पाडं पाठशिवणीच्या खेळागत पळतं हुती.'[६६]

'सारा पाय बेडकीगत फरफारला.'[६७]

'काळ पिल्लं आलं, रोजप्रमाण इकडं तिकडं बघीत घरंदाज बाईगत चालत हुतं.'[६८]

'तुझा जीव तरी मेलेल्या मढ्यागत झालाय.'[६९]

'मोठ्या फळ्या पाण्यात घातल्या की जळक्या गुळाच्या पाण्यागत पाणी दिसायचं.'[७०]

'आभाळं मघाशी लोटल्याल्या खळ्यागतीनं हुतं नि आता लगीच कसं वटारलयां.'[७१]

'तवर आभाळ गळाय लागलं. घरावर बारकं बारकं खडं पडल्यागत वाजाय लागलं.'[७२]

'दीस सोन्याच्या गोळीगत दिसत हुता.'[७३]

'खरं हाडूद-निम्मा अर्धा आजगारांन एकादं बारकं जनावर गिळीत न्यावं तसा आगीच्या जबड्यात निघाला हुता.''[७४]

'गाजराच्या बुडक्यागत सखी हुती. नाकाचा शेंडा बी राघवागत अंगापिंडाने भरल्याली सखी वल्या मानग्यागत दिसतं हुती.'[७५]

'आई हुरदं फाटल्यागत बोलत होती. दादा आभाळ वतल्यागत रडतं हुतु. माझ्या मनाच कोपरं खुरप्यान कापल्यागत झालं हुंत.'[७६]

'घुंगराच्या आवाजानं मन दुधागत उतू जायचं, गाडीच्या चाकागत मन पळत्याल.'[७७]

'मी चुकल्याल्या कोंबडीच्या पिल्यागत झालं हुतो.'[७८]

'पिकं खुळ लागल्याला माणसागत दिसत हुती.'[७९]

'सासरा वळवाच्या ढगागत निघाला हुता.'[८०]

'गावातली घरबी कशी म्हाताऱ्या माणसागत वाकल्याली सारी.'[८१] 'तापल्याला रानाला पाणी देताना वाफ निघावी तसं माझ्या अंगातनं वाफ निघत हुती.'[८२]

'पावळीगतं डोळ्यातनं माझ्या बदादा पाणी गळत हुतं.'[८३]

'गाजराच्या बुडक्यागत पोर त्येच्या आयला, आरं, मर्दा जळक्या लाकडागत दिसतीया.'[८४]

'खळ्यावरच्या भोंबच्या म्हसीगत मन फिरायला लागलं.'[८५]

वरील सर्व उपमांमुळे कादंबरीमध्ये एक प्रकारचा उत्कटपणा, प्रवाहीपणा आल्याचे आपणास दिसून येते. कादंबरीतील प्रत्ययकारी उपमा हे 'गावठाण' चे महत्त्वाचे वाङ्.मयीन वैशिष्ट्ये आहे.

## 'गावठाण' मध्ये येणारी व्यक्तिचित्रणे :

'गावठाण' कादंबरी ही ग्रामीणत्त्वाचा अस्सल असा आविष्कार करणारी आहे. या कादंबरीचे 'कथानक' हे एका खेडेगावाशी संबंधित आहे. या खेडेगावातील माणसं ही श्रद्धा, रूढी, परंपरा यांना घेऊन जगत असतात. शेताभातात राबणं व पशुपक्ष्यांमध्ये रमणं हेच यांचे जीवन असतं. अशी माणसं मनानं खूप साधी व प्रेमळ असतात. त्यांच्यामधील नात्यात एक उत्कट असा जिव्हाळा असतो. निरपेक्ष भावनेनं ही माणसं निरागस प्रेम करताना दिसतात. अशाच प्रकारच्या व्यक्तिरेखा अगदी वस्तूनिष्ठपणे कृष्णात खोतांच्या 'गावठाण' कादंबरीमध्ये आल्याचे आपणास दिसून येते. कादंबरीत काही मुख्य व्यक्तिरेखा तर काही दुय्यम व्यक्तिरेखा चित्रित झाल्याचे दिसून येते. मुख्य व्यक्तिरेखांमध्ये कादंबरीची नायिका आंदी, तिचे आई–वडील, नवरा हे येतात. तर दुय्यम व्यक्तिरेखांमध्ये आंदीचा भाऊ, तिच्या मैत्रिणी रंगी व सखी, गोंदूआबा त्याची बायको, केरूआबा, आंदीची मुलं, तिच्या सासरची मंडळी, तिच्या नवऱ्याचे दोस्त, रामादा, नामूदाजी इ. व्यक्तिरेखा येतात. यामधील प्रत्येक व्यक्तिची विविध वैशिष्ट्ये आपल्याला दिसून येतात. कृष्णात खोतांनी वरील सर्व व्यक्तिचित्रणे ही वस्तूनिष्ठपणे व वास्तव पातळीवर केल्याचे दिसून येते.

**१) आंदी :** 'आंदी' ही 'गावठाण' कादंबरीची नायिका आहे. लेखक कृष्णात खोतांनी 'आंदी'च्या जीवनाची शोकांतिका अतिशय उत्कटतेने आपल्या 'गावठाण' कादंबरीत

मांडली आहे. 'आंदी' ही ग्रामीण भागात शेतकरी व अशिक्षित कूटूंबात जन्मलेली मुलगी आहे. जन्मजात शहाणपण लाभलेली ही मुलगी गुणानं अतिशय चांगली व सुसंस्कारीत असते. अशी ही आंदी आपल्या गुणांमुळे सर्वांची लाडकी बनते. गोंदूआबा तिच्याबद्दल म्हणतो, ''कोंडुदा तुझी पोरगी म्हंजी पोरगीच हाय एवढ्या नहान वयात ती लय शानी हाय.''[८६] अशी ही आंदी लहानपणी गुरढोरं राखण्याबरोबर शेताच्या कामातही आई-वडीलांना मदत करते. आंदीचा आपल्या घरामध्ये असलेल्या माणसांबरोबरच घरातील गुराढोरांवर खूप जीव असतो. गुराढोरांसाठी, पशुपक्ष्यांसाठी व्याकूळ होणारी अशी 'आंदी' आहे. पण या उपजत शहाणपण लाभलेल्या मुलीच्या जीवनाची शोकांतिका सुरू होते. ती तिच्या लग्नानंतर. आई-वडील दारिद्रयात पीचत असतानाही आंदीला त्यांनी चांगला जागा बघून लग्न करून दिले. गुराढोरांमध्ये माळावर रमणारी व वाघुजाई, तांबुजाईवर अपार श्रद्धा असणारी आंदी सासरी निघुन जाते. तरीही तिचा जीव गावात, गुराढोरात, माळावर, आई-दादांमध्ये अडकलेला असतो. लग्नानंतर आंदीच्या जावा जावा मिळून तिला त्रास देत असतात. तरीही तो त्रास ती सहन करते. आंदीला दोन मुली झाल्यानंतर मात्र तिच्या जीवनाची खरी शोकांतिका सुरू होते. घरचे सारे घालूनपाडून बोलतात. नवराही नीट बोलत नाही. अशातच आंदीला तिसऱ्यांदा दिवस जातात. मनानं खचलेली आंदी वाघुजाईला नवस करते. मुलगा होऊ दे म्हणून. वाघुजाईवरील तिच्या श्रद्धेमुळे तिला मुलगा होतो. पण अशातच तिचा नवरा अजारी पडतो व वाढलेल्या दवाखान्यातील खर्चामुळे घरामध्ये संघर्ष सुरु होतात. त्यातूनच घर विभक्त होते. अठराविश्वे दारिद्रय, नवऱ्याचा असाध्य रोग, लहानलहान मुले यामुळे आंदीला आभाळ कोसळल्यागत वाटते. तरीही आंदीचा संघर्ष सुरू असतोच. गुराढोरांवर व रोजगारावर तिचा संसार चाललेला असतो. त्यातच तिचा आजारी नवरा मृत्यू पावतो. आंदीला अकाली वैधव्य येते. आंदीला जीवन संपल्यासारखे वाटते. तरीही आई-दादांच्या आधारावर व छोट्या मुलांकडे बघून आंदी पुन्हा एकवेळ जीवनाशी संघर्ष करण्यासाठी उभी राहते.

त्यातूनच ती आपल्या दोन मुलींची लग्ने करते. परंतु काळ हा तिची परीक्षाच घेत असतो. त्यातच तिचा मुलगा आजारी पडतो. त्याची कोल्हापूरला तपासणी केल्यावर त्याला त्याच्या बापाचाच रोग झालाय हे आंदीला कळल्यावर जन्मभर जीवनाशी, नियतिशी संघर्ष करणारी आंदी पूर्णपणे कोलमडून पडते. व शेवटी अगतिक होऊन म्हणते, ''लय बर हाय...आईचं गाव...इथं काय हाय नि काय नाय! त्ये गावठाणच बरं! ह्ये नगचं आता किच्च करायचं.... बास झालं....''[८७] अशी ही आंदी संपूर्ण कादंबरीत ग्रामीण बोलीभाषेतून आपली कहाणी कथन करून वाचकाच्या मनात कायमचे घर करते.

**२) आंदीचा दादा :** कादंबरीतील दुसरी महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे आंदीचे वडील. आंदी त्यांना दादा म्हणते. आंदीच्या वडीलांचा संसार हा गरीबीचे चटके सहन करत चाललेला असतो. त्यांना दोन मुले असतात. एक मुलगा व एक मुलगी. तिच ही कांदबरीची नायिक आंदी. आंदीच्या दादांचे आंदीवर खूप प्रेम असते. शेतीभातीत व गुराढोरात ते नेहमी गुंतलेले असतात. आंदीच्या मैत्रिणीचे लग्न झाल्यानंतर त्यांना आंदीच्या लग्नाची चिंता वाटते. त्यामुळे प्रचंड दारिद्रय असूनही गोठ्यातील स्वत:ची जनावर विकून प्रसंगी कर्ज काढून ते आंदीचं लग्न एका खाऊन पिऊन सुखी असलेल्या कुटूंबातील मुलाबरोबर करून देतात. ज्या ज्या वेळी आंदीला संसारात काही अडचणी येतात. त्या त्या वेळी तिचा दादा तिच्या पाठीमागे अगदी सावलीसारखा उभा असतो. आंदीचा नवरा वारल्यानंतर तर आंदीचा दादा तिच्या गावची वाटच मळतो. तिला आधार देतो. आंदीच्या दादांच्या प्रेमळ, प्रसंगी कठोर, स्वाभीमानी, कष्टकरी स्वभावाचे चित्रण आपल्याला कादंबरीतून होते.

**३) आंदीची आई :** आंदीची आई ही साध्या, सरळ, प्रेमळ स्वभावाची बाई आहे. आपल्या मुलांवर जीवापाड प्रेम करणं व त्यांच्यासाठी रात्रंदिन राबणं. त्यांना तळहातावरल्या फोडागत जपणं ह्यातच तिचं आयुष्य चाललेलं असतं. आंदीची आई ही जशी प्रेमळ आई आहे. तशीच ती कर्तव्यकठोर संसारी स्त्री आहे. तिचं तिच्या नवऱ्यावर जीवापाड प्रेम आहे. आंदीची आई ही शेतातील व घरातील कामांमध्ये नेहमी स्वत:ला जुंपून घेते. आंदीच्या लग्नासाठी काळजी करणारी व पोटाला चिमटे घेऊन तिचं लग्न करणारी आंदीची आई

आंदीच्या संसारातील संकटे पाहून कोलमडून जाते. रात्रंदिन तिच्या डोळ्यांतून आंदीसाठी पाणी येत राहतं. रुढी, प्रथा, परंपरांचा पुरस्कार करणारी श्रद्धा युक्त भोळ्या समजूती मनात घेऊन जगणारी आंदीची आई काही प्रसंगी आपल्याला अंधश्रद्धाळू असल्याचेही दिसून येते.

**४) आंदीचा नवरा :** रात्रंदिन आपल्या घरासाठी, घराच्या प्रतिष्ठेसाठी राबणारा आंदीचा नवरा हा समाजात मिसळणारा, गोर गरीबांसाठी राबणारा, गरजवंताना मदतीचा हात देणारा व असंख्य माणसांच्या मनात आपल्या चांगल्या गुणांमुळे कायमचं घर करणारा आहे. घरासाठी काबाडकष्ट करून व घरातल्या माणसांसाठी उभं आयुष्य झिजवूनही ज्यावेळी तो आजारी पडतो त्यावेळी घरची रक्ताची नाती त्याची साथ सोडतात. व त्याला एकाकी पाडतात. अशावेळी त्याला त्याची दोस्त मंडळी खूप आधार देतात. त्यावेळी तो म्हणतो, ''रक्ताचं कोण न्हवं बघ. जोडल्याली माणसचं लय उपकार करत्यात.''[८८] सुरवातीला घरच्यांसाठी बायकोला बायको न म्हणणारा आंदीचा नवरा आंदीचा जीवघेणा एकाकी संघर्ष पाहून तुटून जातो. त्यावेळी तो आंदीला म्हणतो, ''आंदे किचा देव तुझी परीक्षा घेतोय! माणूस नावाच्या जातीवर ईस्वास ठेवूनच माणूस मरतोय.''[८९] असा हा अनेकांच्या मनात घर करणारा आंदीचा नवरा आंदीला अर्धीच साथ देऊन कायमचाच देवाघरी निघून जातो.

या मुख्य व्यक्तिरेखांबरोबरच कादंबरीमध्ये आंदीचा आण्णा, गोंदूआबा, त्याची बायको, नारुआबा, सखी, रंगी, आंदीची मुलं, तिच्या नवऱ्याचे दोस्त रामादा, नामूदाजी, गणपूदा, तिच्या सासरची माणसं, दसरू पाटील इ. व्यक्तिरेखा वस्तूनिष्ठपणे येऊन जातात.

## वाक्प्रचार, म्हणी यांचा वस्तुनिष्ठ उपयोग :

'गावठाण' मधून प्रकट होणारी भाषाशैली यशस्वी होण्यापाठीमागे वापरलेल्या निवेदन पद्धतीबरोबरच, तिचे मनाचा वेध घेणे, तिच्यातील प्रवाहीपणा, तिचं बोलीमधून व्यक्त होणं, तिच्यामधील काव्यात्मता, उपमांचा, प्रतिकांचा, प्रतिमांचा वापर हे जसं महत्त्वाचं ठरतं त्याचपद्धतीने कादंबरीमध्ये बोलीभाषेतून अवतीर्ण झालेले काही वाक्प्रचार

व म्हणी ही कारणीभूत ठरतात. ग्रामीण बोलीतून प्रकट होणाऱ्या या कांदबरीत अनेक ठिकाणी समर्पक वाक्प्रचार व म्हणींचा लेखकाने चपखलपणे वापर केला आहे. ग्रामीण भागात बोलल्या जाणाऱ्या या वाक्प्रचारामुळे व म्हणींमुळे कादंबरीला एक प्रवाहीपणा व काव्यात्मता लाभल्याचे दिसून येते. वाक्प्रचार व म्हणींना खऱ्या अर्थाने भाषेचे अलंकार असे म्हटले जाते. या कादंबरीमध्ये दिसून येणारे वाक्प्रचार व म्हणी पुढीलप्रमाणे–

'आज ते सैरं बैरं झालतं.''[९०] या ठिकाणी ग्रामीण बोलीतील सैरंबैर होणे म्हणजे गोंधळून जाणे, चलबिचल होणे या अर्थाचा वाक्प्रचार दिसून येतो. त्याचपद्धतीने–

'नि कसा पडल्या पडल्या डोळा लागला, उठून बघतोयं तर दिसानं पार मान टाकल्याली.'[९१] या ठिकाणीही आपल्याला 'डोळा लागणे व मान टाकणे' हे वाक्प्रचार वापरल्याचे दिसून येते. अशा वाक्प्रचारामुळे भाषाशैली अधिक जिवंत वाटते त्याचबरोबर 'परत गाय न्हाईतर एकादं व्ढार आलं तर खांडूळी झालीच म्हणून समजं.'[९२] या ठिकाणीही 'खांडूळी' करणे म्हणजे 'तुकडे तुकडे करणे' या अर्थाचा वाक्प्रचार आल्याचे दिसून येते. तसेच 'खुराड्यात कोंबडी आलीतं माझा जीव लाकलाक हालाय लागला.'[९३] या ठिकाणीही जीव लाक लाक हालणे हा ग्रामीण बोलीत वापरला जाणारा वाक्प्रचार आल्याचे दिसून येते. तसेच 'त्यात म्हातारा पावूस आभाळ फाटल्यागत वतत हुता.'[९४] इथेही आभाळ फाटणे हा वाक्प्रचार आल्याचे आढळून येते. तसेच 'शिवरीच्या ढाप्याकडंनी मी बघीटलं, तर पोटात गोळाच आल्यागत झालं.'[९५] या ठिकाणीही पोटात गोळा येणे म्हणजे खूप भिती वाटणे. हा वाक्प्रचार वापरल्याचे दिसून येते. अशा प्रकारचे अनेक वाक्प्रचार व म्हणी कादंबरीतील काही विधानांमधून आल्याचे दिसून येते. ते पुढीलप्रमाणे–

''पोरं काय माळावर झोपा काढाय जात्यातं''

''लय नाक फुगवून बोलू नकं.''

''बायकातर गड्यांवरती पैलवानागत शड्डू मारत्यात.''

''मी ठो ठो बोंबलायला लागलो.''

''घरात दुभतबी भक्कळ झालं हुतं.''

''पावसाचा डोळा उघडा न्हाई.''

''रातीला डोळ्याला डोळा न्हाई.''

''आंदे आज ढोरांस्नी निवंद दाखवायचा हाय काय गं.''

''अण्णा जेवून पोत्याव आडवा झाला हुता.''

''तसं माझ मन चराकलं.''

''ये तुझा बाजार भरला त्यो.''

''गायीच्या पाठीमागं पनवतीच लागली.''

''आमी पोरं पोरी ठार इरगाळून जाईत हुतो.''

''आवं तिळा-तांदळाच्या गाठी पडायच्या असल्यावर तुमचं आमचं काय?''

''तिला भडभडून आलं नि हुंदकाच फुटला.''

''मी चितागती व्हायची.''

''खाऊन पिऊन माणसं सुखी हायतं.''

''गाडीवानाला घाम फुटला.''

''मला गलबलून आलं.''

''दोन सऱ्या भरून कानात वार शिरल्यागत पाणी पळत हुतं.''

''माझ्या घराचा मांडव घालायचा न्हाई.''

''आई-दादांचा जीव दोरीला टांगल्यागत व्हीत हुता.''

''सारी रात निपचित पडली हुती.''

''या पोरीला तरी जिकडं जाईलं तिकडं पाण्यात पडल्यावाणी हुतीया.''

''तू उगच डोस्क्यात राखं घालून घेवू नको.''

''नाक घासून वाघुजाईला सांगीतल.''

''नि मनाचा बांध फुटला.''

''दोन चार दीसानं म्हसं राकंला लागली.''

''माझं काळीज उसवल्यागत झालं.''

''पोरीकडंनी जीव थाऱ्याला लागला.''

त्याचबरोबर कादंबरीमध्ये आलेल्या म्हणी पुढीलप्रमाणे–

'' चोरून पोळी नि वरडून गुळणी.''

''जवाचं घव तवाच्या पोळ्या.''

''ह्या माणसासंग वैर म्हंजी पाण्यात न्हाऊन माश्यासंग वैर.''

''खरं गाडीचा माग फेसाटीन तरी मोडायला पाहिजेया.''

''आमचं जळता जळत न्हाई.''

''मुतानं हुगळायची नि चांण्यानं वाळायची जिमीन.''

''आमच्या गावाकडची रानं म्हंजी मुंगीला मुताचा पूर.''

''बारसं म्हंजी दुष्काळात धोंडा म्हैनाच हुतं.''

''गेल सारं गंगेला मिळालं.''

''सांगायला मळा खरं गेलंती कळा.''

''सटवीचा लिखा नि कधी न्हाई चुका.''

वरीलप्रमाणे अनेक म्हणी व वाक्प्रचार आपल्याला कांदबरीमध्ये आढळून येतात. म्हणी व वाक्प्रचारांमुळे गावठाण कादंबरीच्या सौंदर्यात भर पडून ती अधिक जिवंत व रसरशीत वाटते.

## अस्सल ग्रामीण शिव्यांचा समावेश :

कृष्णात खोतांची 'गावठाण कादंबरी अनेक वाड्.मयीन गुणांनी समृद्ध असल्याने तिचे वाड्.मयीन मूल्य श्रेष्ठ दर्जाचे आहे. 'गावठाण' कादंबरीही ग्रामीणत्त्वाचा अस्सल आविष्कार करणारी असल्याने त्यामध्ये ग्रामीण भागातील बोलीचा लेखकाने वापर केला आहे. तसेच कादंबरीमध्ये येणाऱ्या उपमा, प्रतिके, म्हणी, वाक्प्रचार हे ही ग्रामीणत्त्वाशी संबंधित असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर ग्रामीणत्त्वाचा खराखुरा आविष्कार करणाऱ्या ग्रामीण भागातील अस्सल ग्रामीण शिव्याही 'गावठाण' कादंबरीमध्ये येताना दिसून येतात.

त्या कधी प्रेमाने तर कधी रागाने आल्याचे दिसते. असे असले तरी कादंबरीमध्ये आलेल्या शिव्यांमुळे कादंबरी अस्सल व अधिक वास्तवपूर्ण वाटते. कादंबरीमध्ये काही विधानांमधून आलेल्या शिव्या पुढीलप्रमाणे–

''रांड, तुझी मया आली म्हणताया म्हणतोया.''

''त्येच्या बायला मी. बेनी गावठाणावर नि ढोरं पिकात.''

''झवण्यास्नी जाळीतच पालथी पाडून मारून टाकयचीत.''

''तुझ्या भनं, तुझी ढोरं कुठं जात्यात ते बघतोय, नि गावाच्याबी आईला भंगी लावला न्हाई तर इचार.''

''हे रांड, कुणीतरी ऐकलं.''

''गायीला रांडला काय?''

''पाडे रांड, तुला म्हार खाईना का! तू लय तेगार केलसं आज. तू चल घरात. तुझा दाणा कसा चेचतो बघ.''

जळलेला माळ विझवायला सारा गाव गेला होता. तेव्हा बायका आग लावणाऱ्याला पुढीलप्रमाणे शिव्या देत होत्या. ''कुठल्या भाड्यानं काढी वडली आसलं. त्येच्या सरणावर कवा कोण काढी वढील... त्येची बायकू कवा रांड हुईल... आमच्या ढोरागुरांचा शाप त्येच्या पोराबाळास्नी लागलं. कवा त्येंच्या पोराबाळाचा घास मातीत पडतं. आमच्या ढोरांचा घास जाळला भाड्यानं.''[९६] त्याचबरोबर–

''रांड रडून रडून घर भिजिवलंस.''

''हे भाड्यानू तूमच बाप मोठ हायतं, इथं यायच न्हाई.''

''त्येंच्या आईस्नी गाढवं लावल्याबिगार येत्यात.''

''कोणं रांड का भाड्या जाऊन आलाय पासलं पडून तिथं.''

''आसली ढोरं पाळीसतवर म्हाराला इकल्याली बरी.''

वरीलप्रमाणे गावरानं शिव्या कादंबरीत येऊन कादंबरीचा वास्तवदर्शीपणा वाढल्याचे आपणास दिसून येते.

## कृष्णात खोतांच्या लेखनाचे वेगळेपण :

ग्रामीण मातीतून जन्म घेणाऱ्या नवलेखकांमध्ये कृष्णात खोतांचा समावेश होतो. त्यांची 'गावठाण' ही पहिलीच कांदबरी असली तरी त्या कादंबरीचे वाङ्.मयीन मूल्य अतिशय श्रेष्ठ दर्जाचे आहे. ग्रामीण वास्तवाला भिडणारी ही कांदबरी कृष्णात खोतांच्या, लेखनाचे वेगळेपण स्पष्ट करते. लेखकाचा संपूर्ण पिंड ग्रामीण भागात घडलेला आहे. त्यामुळे त्यांनी जे ग्रामीण जीवनात भोगलेलं, पाहिलेलं, जगलेलं, सोसलेले अनुभव वास्तव पातळीवर येऊन जिवंतपणे मांडलेले आहेत. गावठाण मध्ये ग्रामीण भागातील जीवनाचं चित्रण करण्यासाठी त्यांनी जे तंत्र वापरलेलं आहे. ते स्वतंत्र अशा स्वरूपाच आहे. संरळ ग्रामीण भाषेला शोभेल अशीच भाषाशैली, वास्तवाला साजेसं, समाज चित्रण, लेखनातील परखडता, कांदबरीला मिळालेलं कथानक या सर्व गोष्टी त्याचं ग्रामीण जीवनाशी असणारे संबंधच दाखवित नाहीत. तर कादंबरीला एक वेगळीच उंची प्राप्त करून देतात. कृष्णात खोत हे ग्रामीण जीवनाचा, ग्रामीण जीवनातील अनेक गोष्टींचा उंचापुरा आलेखच वाचकांच्यासमोर उभा करण्यात ते निश्चितपणे यशस्वी झाल्याचे दिसून येते.

लेखक कृष्णात खोत हे अतिशय स्पष्ट आणि वास्तवपातळीवर येऊन लेखन करतात. ग्रामीण भागातील दारिद्रयाचे तेथील रुढी, प्रथा, परंपरेबरोबरच, श्रद्धा व अंधश्रद्धांचे, सुख–दु:खाचे त्यांनी अधिक वास्तव पातळीवर येऊन वर्णन केले आहे. त्यामुळे या कांदबरीतील कथानक ग्रामीण भागामध्ये कुठेही घडू शकेल. इतके सहज लेखन लेखकाने केले आहे. हे लेखन करताना कादंबरीतील घटना प्रसंग, ग्रामीण भाषा शब्दरचना, वाक्यरचना, म्हणी, वाक्‌प्रचार काव्यात्मता या गोष्टी कृत्रीमपणे आणलेल्या नाहीत. तर त्या सहज येतात आणि कादंबरीतील कथानकास उपयुक्त ठरतात. कृष्णात खोतांनी कादंबरीमध्ये कथानकाची मांडणी ही आधी, मध्य व अंत अशा सूत्रामध्ये अतिशय योग्य व भावस्पर्शी पद्धतीने केली आहे. कादंबरीचा शेवट करताना तर, आयुष्यभर जीवनाशी प्रचंड संघर्ष करणाऱ्या आंदीला जेव्हा मुलालाही वडलाचाच रोग झालाय हे कळते

तेव्हा ती पूर्णपणे कोसळते. आणि इथेच कादंबरीचा शेवट होतो, पण लेखकाने कांदबरीच्या नायिकेच्या तोंडी शेवटी दिलेली वाक्ये खूप काही सांगणारी व कादंबरीला यशस्वी करणारी ठरतात. शेवटी आंदी म्हणते, ''खरं वाटाय लागलं. बिचारा जातानं 'बी' च्या 'बी' नि कीडच्या कीड ठेवून गेला. कवा कवा न्हाई. खरं आज रागच आला.''[१७] इथे आंदीचे 'आईपण' दिसून येते. याच ठिकाणी कृष्णात खोतांचे वेगळेपण आपल्याला दिसून येते.

त्याचबरोबर त्यांनी पात्रांचे चित्रणही अतिशय वस्तूनिष्ठ शब्दात व वास्तव पातळीवर येऊन केले आहे. ग्रामीण परिसर जिवंत उभा करताना तेथील जीवन पद्धतीबरोबरच पशुपक्षी, प्राणी यांची होणारी होरपळ त्यातून मानवी मनाची होणारी उलाघाल अतिशय उत्कट अशी मांडली आहे. त्यामुळे ही कांदबरी मनाला चटका लावून जाते व इतर कादंबऱ्यांपेक्षा निश्चितपणे वेगळ्या स्वरूपाची तसेच कुठल्याही पारंपरिक संस्काराचा स्पर्श नसलेली, सहजपणे उलघडत जाणारी ही स्वयंभू कादंबरी मराठी ग्रामीण साहित्याचा नवा टप्पा गाठत असल्याचे जाणवते.

**निष्कर्ष :**

१) गावठाण कादंबरीचे निवेदन हे प्रथमपुरूषी एकवचनी अशा स्वरूपाचे आहे.

२) कादंबरीमध्ये पन्हाळ्याच्या परिसरातील बोली भाषेचा वापर करून संपूर्ण कादंबरीही बोलीभाषेतून साकारली आहे.

३) कादंबरीची भाषा ही मनाचा वेध घेणारी तसेच प्रवाही स्वरूपाची आहे.

४) कादंबरीमध्ये भावपूर्ण व उत्कट असे संवाद प्रकट झाल्याचे दिसून येते.

५) कांदबरीमध्ये काव्यात्मता डोकावताना दिसते.

६) गावठाण मध्ये येणारी व्यक्तिचित्रणे ही वस्तुनिष्ठ व वास्तवस्पर्शी वाटतात.

७) गावठाणामध्ये प्रतिमा, वाक्प्रचार, म्हणी, सांकेतिक शब्द, प्रतिमा, प्रतिके, ग्रामीण अस्सल शिव्या इ. वाड्.मयीन वैशिष्ट्येही येतात.

८) कादंबरीतून आपल्याला कृष्णात खोतांच्या लेखनाचे वेगळेपण लक्षात येते.

## सारांश :

'गावठाण' कादंबरीचे वाङ्.मयीन मूल्यमापन या चौथ्या प्रकरणामध्ये 'गावठाण' कादंबरीची वाङ्.मयीन मूल्यांच्या आधारे सखोल चिकित्सा केली आहे. गावठाणमध्ये येणारी निवेदन पद्धती, भाषा, भाषेतील प्रवाहीपणा, उत्कटता, काव्यात्मता या गोष्टींची चर्चा केली आहे. बोलीभाषेत अवतरलेली ह्या कादंबरीतील भाषाशैली कशा पद्धतीने मनाचा वेध घेते. याची मीमांसा केली. त्याचपद्धतीने कादंबरीतील संवाद, व्यक्तिचित्रणे, उपमा, वाक्प्रचार, म्हणी, ग्रामीण शिव्या इ. वाङ्.मयीन वैशिष्ट्यांबरोबरच कृष्णात खोतांच्या लेखनाचे वेगळेपण याच्यावर सखोल चिकित्सा करून सदर प्रकरणाचा उहापोह केला आहे.

**संदर्भसूची :**


१) स.रा. गाडगीळ, 'काव्यशास्त्र प्रदीप', पृ.४.

२) कृष्णात खोत 'गावठाण' मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्रथमावृत्ती, पृ.१.

३) तत्रैव, पृ.१.

४) तत्रैव, पृ. ३.

५) तत्रैव, पृ. ९.

६) तत्रैव, पृ.९.

७) तत्रैव, पृ. १३.

८) तत्रैव, पृ. २३.

९) तत्रैव, पृ.३४.

१०) तत्रैव, पृ. ६१

११) तत्रैव, पृ. ९३.

१२) तत्रैव, पृ. १२.

१३) तत्रैव, पृ. २२.

१४) तत्रैव, पृ. २३.

१५) तत्रैव, पृ. २८.

१६) तत्रैव, पृ. २९.

१७) तत्रैव, पृ. ३३.

१८) तत्रैव, पृ. ३७.

१९) तत्रैव, पृ. ४२.

२०) तत्रैव, पृ.. ४६.

२१) तत्रैव, पृ. ४७.

२२) तत्रैव, पृ. ८३.

२३) तत्रैव, पृ. ८६.

२४) तत्रैव, पृ. ५.

२५) तत्रैव, पृ. ६.

२६) तत्रैव, पृ. ११.

२७) तत्रैव, पृ.१२.

२८) तत्रैव, पृ. १३.

२९) तत्रैव, पृ.२६.

३०) तत्रैव, पृ. १.

३१) तत्रैव, पृ. ४०.

३२) तत्रैव, पृ. ४८.

३३) तत्रैव, पृ.५२.

३४) तत्रैव, पृ. ५४.

३५) तत्रैव, पृ. ५७.

३६) तत्रैव, पृ. ६३.

३७) तत्रैव, पृ. ८६.

३८) तत्रैव, पृ. ७९.

३९) तत्रैव, पृ. ९५.

४०) तत्रैव, पृ. २३.

४१) तत्रैव, पृ.६०.

४२) तत्रैव, पृ. ५.

४३) तत्रैव, पृ. ६.

४४) तत्रैव, पृ. १०.

४५) तत्रैव, पृ. १७–१८.

४६) तत्रैव, पृ. २६–२७.

४७) तत्रैव, पृ. ३६.

४८) तत्रैव, पृ. ३८.

४९) तत्रैव, पृ. ४५.

५०) तत्रैव, पृ.५३.

५१) तत्रैव, पृ. ५७.
५२) तत्रैव, पृ. ८५.
५३) तत्रैव, पृ. १०४.

५४) तत्रैव, पृ. १.

५५) तत्रैव, पृ. १.

५६) तत्रैव, पृ. २.

५७) तत्रैव, पृ. ३.

५८) तत्रैव, पृ. ५.

५९) तत्रैव, पृ. ६.

६०) तत्रैव, पृ. ७.

६१) तत्रैव, पृ. ७.

६२) तत्रैव, पृ. ८.

६३) तत्रैव, पृ. ९.

६४) तत्रैव, पृ. ११.

६५) तत्रैव, पृ. १२.

६६) तत्रैव, पृ. १३.

६७) तत्रैव, पृ. १३.

६८) तत्रैव, पृ. १५.

६९) तत्रैव, पृ. २०.

७०) तत्रैव, पृ. २१.

७१) तत्रैव, पृ. २३.

७२) तत्रैव, पृ. २५.

७३) तत्रैव, पृ. ३१.

७४) तत्रैव, पृ. ३२.

७५) तत्रैव, पृ ३५..

७६) तत्रैव, पृ. ४०.

७७) तत्रैव, पृ. ४६.

७८) तत्रैव, पृ. ४९.

७९) तत्रैव, पृ. ५०.

८०) तत्रैव, पृ. ५२.
८१) तत्रैव, पृ. ५७.
८२) तत्रैव, पृ. ६६.
८३) तत्रैव, पृ. ७०.
८४) तत्रैव, पृ. ७५.

८५) तत्रैव, पृ. १०६.

८६) तत्रैव, पृ. २५.

८७) तत्रैव, पृ. १०६.

८८) तत्रैव, पृ. ६४.

८९) तत्रैव, पृ. ७१.

९०) तत्रैव, पृ. ४.

९१) तत्रैव, पृ. ७.
९२) तत्रैव, पृ. १०.
९३) तत्रैव, पृ. १४.
९४) तत्रैव, पृ. १६.
९५) तत्रैव, पृ. ३०.
९६) तत्रैव, पृ. ३२-३३.
९७) तत्रैव, पृ. १०६.